[illegible]

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-[illegible]

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :-४.१०.२००२

संदर्भ :- (१) शा.प.सा.प्र.वि.क्र. बीसीसी-१०७७/१५२२/सोळा,
दिनांक २९ ऑक्टोबर, १९७७
(२) शा.प.सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/प्र.क्र.५[illegible]
दिनांक १/११/२००१.

शासन परिपत्रक :-

सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७७/१५२२/१६ दिनांक २९ ऑक्टोबर, १९७७ च्या शासन परिपत्रकान्वये मागासवर्गीयांची सेवा भरती दर्शविणारे वार्षिक विवरण [illegible] सर्व मंत्रालयीन विभाग आणि विभाग प्रमुखांना सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु या सूचनांचे पालन [illegible] करण्यात येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याचे दिसून येते.

२. मागासवर्गीय उमेदवारांच्या प्रत्येक वर्षीच्या सेवाभरतीसंबंधातील वार्षिक विवरण सादर करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती काटेकोरपणे अनुसरण्यात यावी असे निदेश शासन देत आहे.

(अ) मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासनिक नियंत्रणाखालील विभागांच्या प्रमुखांना, वार्षिक विवरणाच्या संबंधातील माहिती विहित प्रपत्रामध्ये संकलित करुन ती प्रत्येक वर्षी १५ फेब्रुवारीपूर्वी न चुकता मंत्रालयाच्या प्रशासनिक विभागाकडे पाठवण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. ठरलेल्या तारखेपर्यंत विवरणपत्र न पाठवणाऱ्या विभाग प्रमुखांची नावे प्रत्येक वर्षी २५ फेब्रुवारीपर्यंत सामान्य प्रशासन विभागाला कळविण्यात यावीत.

(ब) विभाग प्रमुखांनी आपापल्या पध्दतीने त्यांच्या दुय्यम कार्यालयांकडून माहिती [illegible] कार्यवाही सुरु करावी आणि प्रत्येक वर्षी २० जानेवारीपर्यंत आवश्यक ती माहिती न देणाऱ्या [illegible] विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्याबाबतचे निदेश, विभाग प्रमुखांना द्यावेत. दुय्यम कार्यालयांकडून माहिती गोळा करण्याची जबाबदारी विभाग प्रमुखांची असते आणि प्रत्येक वर्षी आपापल्या मंत्रालयीन विभागाकडे १५ फेब्रुवारीपर्यंत त्यांनी जी माहिती पाठवणे आवश्यक असते ती त्यांच्याकडे पाठवण्यात येत आहे. याची खात्री करुन घेण्यासाठी विभाग प्रमुखांना आवश्यक वाटेल अशी कार्यवाही त्यांनी केली पाहिजे असे त्यांना स्पष्टपणे कळविण्यात यावे.

(क) मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासनिक नियंत्रणाखालील [illegible] संबंधातील विवरणे एकत्रित केली पाहिजेत आणि संचालक, समाजकल्याण, पुणे यांच्याकडे [illegible] स्वतः मंत्रालयीन विभागांचे आणि त्यांच्या प्रशासनिक नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुखांकरिता / कार्यालयांकरिता असे एक एकत्रित (खंडशः नव्हे) विवरण पाठवले पाहिजे. असे एकत्रित विवरण प्रत्येक वर्षी १५ मार्चपर्यंत संचालक, समाजकल्याण, पुणे यांच्याकडे पाठविण्यात यावे व त्याची एक प्रत सामान्य प्रशासन विभागाला [illegible] यावी.

(ड) मागास उमेदवारांकरिता जागा राखून ठेवण्यासंबंधीच्या व त्यांची भरती [illegible] कामाकरिता जनसंपर्क अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या मंत्रालयीन विभागांमधील आस्थापनेचा [illegible] उपसचिव यासंबंधातील आवश्यक कार्यवाही सुरु करण्यास व तिचा जोमाने पाठपुरावा करण्यास [illegible] या कामाचा प्रभार [illegible] उपसचिवांकडे असेल त्यांची नावे सामान्य प्रशासन विभागाला कळविण्यात [illegible].

एच-९९९(अ)(५०१०-१०-०२) [illegible]

G.R.4.10.2002C:\lotus\work\wordpro

स्थायी आदेशांच्या अनुसार मेहेतर म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींची अनुसूचित जातींकरिता वर्ग-४ मध्ये ज्या रिकाम्या जागा राखून ठेवलेल्या असतात त्या जागांच्या संबंधात गणना करण्यात येणार नाही. मेहेतरांच्या संख्येचा वार्षिक विवरणात दर्शविलेल्या वर्ग चारच्या आकडयांमध्ये समावेश होणार नाही. हे आकडे वार्षिक विवरणात स्वतंत्र प्रवर्गामध्ये दर्शविण्यात आले पाहिजेत. वर्ग चार संबंधातील आकडयांमध्ये मेहेतरांची संख्या समाविष्ट नाही अशा अर्थाची टीप वार्षिक विवरणाच्या शेवटी विनिर्देशपूर्वक समाविष्ट करण्यात आली पाहिजे.

३. मागासवर्गीयांच्या भरतीचे वार्षिक विवरणपत्र प्रत्येक वर्षाला संचालक, समाजकल्याण, पुणे आणि अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांना दिनांक २८ फेब्रुवारी पर्यंत संदर्भ क्रमांक (२) च्या शासन परिपत्रकातील विवरणपत्रानुसार न चुकता पाठविण्यात याव्यात. याबाबत असेही स्पष्ट करण्यात येते की, या आदेशांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी. टाळाटाळ, व निष्काळजीपणा दाखविणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाईही करण्यात यावी. मंत्रालयीन विभाग / विभाग प्रमुख यांनी त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय / निमशासकीय सेवा / मंडळे / महामंडळे इत्यादी आस्थापनेवरील ही माहिती शासनास प्रत्येक वर्षीच्या दिनांक २८ फेब्रुवारी पर्यंत पाठवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दे.त्र्यं.कुमावत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव / अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
*प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

---x---

G.R.4.10.2002C:\lotus\work\wordpro